महावितरण
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email :ciro@mahadiscom.inwebsite : www.mahadiscom.inदूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U40109MH2005SGC153645

जा. क्र. औसंवि/ब/शिष्य २०२१-२२/२९२८० दिनांक : **०१.१२.२०२१**

प्रति,
मुख्य अभियंता
म.रा.वि.वितरण कं.मर्या.,
परिमंडळ कार्यालय अकोला / अमरावती / औरंगाबाद / बारामती / भांडूप / चंद्रपूर / गोदिंया / जळगांव / कोल्हापूर / कल्याण / लातूर / नांदेड / नागपूर / नाशिक / पुणे / रत्नागिरी.

**विषय** :म.रा.वि.मं.कर्मचारी कल्याण निधीमधून कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरिता मागविण्यात आलेल्या अर्ज सादर करण्याकरिता मुदतवाढ देणेबाबत.
**संदर्भ** : या विभागाचे मुदतवाढीचे पत्र क्र.२६३३८ दि.२६.१०.२०२१

----

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, संदर्भीय पत्रान्वये माहे मार्च / एप्रिल - २०२१ या शैक्षणिक वर्षात माध्यमिक शालांत (इयत्ता १०वी) व उच्च -माध्यमिक शालांत (इयत्ता १२वी) परिक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या तसेच, यापूर्वी मंजूर करण्यात आलेली शिष्यवृत्ती पुढे सलगपणे चालू ठेवण्यासाठी तिन्ही कंपन्यांतील कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधीमधून शिष्यवृत्ती मंजूर करण्याकरिता अर्ज दि.३०.११.२०२१ पर्यंत मुदतवाढ देवून मागविण्यात आलेले होते.

परंतु, कोव्हिड - १९ च्या विषाणुच्या प्रादुर्भावामुळे काही शैक्षणिक सत्राचे पुढील वर्गात प्रवेश घेण्याची प्रक्रिया चालू असल्यामुळे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांनीही शिष्यवृत्तीचे अर्ज सादर करावयाच्या तारखेमध्ये दि.३१.१२.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच, कर्मचाऱ्यांच्या पाल्यांची पुढील वर्गात प्रवेश अंतिम न झाल्यामुळे त्यांना परिपूर्ण अर्ज सादर करु शकत नसल्याबाबत उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांच्याकडून दुरध्वनी संदेशाद्वारे कळविलेले आहे.

त्यानुषंगाने, माहे मार्च / एप्रिल - २०२१ या शैक्षणिक वर्षात माध्यमिक शालांत (इयत्ता १०वी) व उच्च -माध्यमिक शालांत (इयत्ता १२वी) परिक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या तसेच, यापूर्वी मंजूर करण्यात आलेली शिष्यवृत्ती पुढे सलगपणे चालू ठेवण्यासाठी तिन्ही कंपन्यांतील कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना परिपूर्ण अर्ज सादर करावयाच्या **मुदतीमध्ये दि.३१.१२.२०२१ पर्यंत वाढ** करण्यात येत आहे.

(संजय रा. ढोके)
**मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी**

प्रत सविनय सादर :
मा. संचालक (वित्त), म.रा.वि.मं.सुत्रधारी कं.मर्या., हॉंगकॉंग बॅंक इमारत, फोर्ट, मुंबई.
प्रत सस्नेह सादर :
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महानिमिती / महापारेषण, सांघिक कार्यालय, मुंबई.
प्रत :
१. सह मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महावितरण, सांघिक कार्यालय, मुंबई.
२. उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महावितरण, अकोला / औरंगाबाद / अमरावती / भांडूप / बारामती / चंद्रपूर / गोंदिया / कल्याण / कोल्हापूर / लातूर / जळगांव /नाशिक / पुणे / नागपूर / रत्नागिरी / नांदेड.